प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सांगली

दुरध्वनी क्रमांक - ०२३३-२३७२७१७ ई मेल - eoprisang@gmail.com

*****************************************************************************

जा.क्रं.जिपसां/प्राशिवि/आस्था-१९/४६४/ १५०८२ /२०२४ दिनांक-१४/१० /२०२४

## नमुना दोन

ग्राम :-

युडायस क्रमांक :-

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ७ | ३ | ५ | १ | १ | ० | ० | ४ | ० | ७ |

व्यवस्थापक :- **भारती विद्यापीठ,पुणे**

विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ,बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम ११, पोट नियम (४) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

**माननीय महोदय/महोदय,**

आपल्या दिनांक - **२३/०९/२०२४** या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी या आधारे ,

मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प.सांगली दिनांक - ०१/०४/२०२२ पासून दिनांक ३१/०३/२०२५ पर्यंत तीन वर्षांच्या कालावधीसाठी <u>इ.१ली.ते इ.८वी.</u>करीता - **भारती विद्यापीठ इंग्लिश मिडीयम स्कूल, कडेगाव, ता. कडेगाव, जि.सांगली.**या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

<u>**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे**</u> :-

१.मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

२.बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ (जोडपत्र दोन ) मधील तरतुदीचे शाळा पालन करील.

३.शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत , त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

४.परिच्छेद ३ निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

५.संस्था / शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसुल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्याच्या किंवा तिच्या माता - पित्यास किंवा पालकांस भाग पाडणार नाही.

६.कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी ,धर्म जात किंवा वंश ,जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.

७.(एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याहीबालकांस शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास , नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यातयेईल.

(पाच) विकलांग/ विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारीत केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता धारण न करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता पाच वर्षांच्या कालावधीत संपादीत करावी लागेल

(सात) अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची / तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील, आणि